# आकाशवाणी पुणे
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 21.11.2023** **वार – मंगळवार**

---

**महा रेशीम अभियान**

शेतकऱ्यांना रेशीम शेतीबाबत मार्गदर्शन करण्यासाठी आणि रेशीम शेतीचे फायदे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी पुणे जिल्ह्यात 20 नोव्हेंबर ते 20 डिसेंबर या कालावधीत महारेशीम अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा प्रारंभ पुणे विभागीय कृषी सहसंचालक रफीक नाईकवाडी आणि प्रादेशिक रेशीम कार्यालयाच्या सहसंचालक डॉ.कविता देशपांडे यांच्या हस्ते काल झाला.राज्यात प्रथमच जिल्हा परिषद, रेशीम संचालनालय आणि राज्याचा कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमानं हे अभियान राबवण्यात येत असू,या काळात जिल्ह्यात नव्यानं रेशीम शेती करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात येणार आहे. राज्यात एकराच्या रेशीम शेतीतून अनेक शेतकऱ्यांनी चांगले उत्पन्न घेतले असून, पुणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी रेशीम शेतीकडे वळावं असं आवाहन नाईकवाडी यांनी यावेळी केलं.

**संयुक्त कुष्ठरोग**

राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीनं कालपासून संयुक्त कुष्ठरोग शोध अभियान आणि सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिमेला सुरुवात करण्यात आली आहे. हे अभियान 6 डिसेंबरपर्यंत राबविण्यात येणार असून अधिकाधिक नागरिकांनी या अभियानाचा लाभ घेण्याचं आणि या विशेष अभियानाला सहकार्य करण्याचं आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागानं केलं आहे. गृहभेटी अंतर्गत राज्यातील 1 कोटी 75 लाख घरांचे सर्वेक्षण केले जाणार असून, अंदाजे 8 कोटी 66 लाख लोकसंख्येचे सर्वेक्षण केले जाणार आहे. क्षयरोगाचे निदान झालेल्या रुग्णांवर मोफत औषधोपचार करण्यात येणार आहेत.

**महापालिका**

बदलती जीवन शैली आणि कोरोना संसर्गानंतर तरुणांमध्ये वाढलेले उच्च रक्तदाब आणि मधुमेह आजाराचं प्रमाण पाहता महापालिका या दोन आजारांवरील जेनेरिक औषधं मोफत उपलब्ध करून देणार आहे. आरोग्यवर्धिनी योजनेंतर्गत महापालिकेच्या 55 दवाखान्यात रक्तदाब आणि मधुमेहाची

औषधं मोफत दिली जाणार आहेत तर 19 प्रसूतिगृहांत येत्या दीड महिन्यात जेनेरिक औषधे विक्री केंद्र सुरू करणार आहे. महापालिका आरोग्य प्रमुख डॉ. भगवान पवार यांनी हि माहिती दिली.

**किसान सभा**

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या कृषी कर्जांचे पुनर्गठन न करता ,संपूर्ण कर्ज माफ करावं , अशी मागणी पुणे किसान सभेनं केली आहे. राज्यातल्या 140 तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. यामुळे शेतकरी आणि शेतमजुरांच्या उपजीविकेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत राज्य सरकारनं कर्जमाफी, वीजबिल माफीबरोबरच शेतकरी आणि  शेतमजुरांना ,उपजीविकेसाठी किमान पाच हजार रुपये प्रतिमहा तगाई द्यावी, अशी मागणी किसान सभेनं केली आहे.

**इम्युटेशन**

पुणे महापालिका हद्दीत नवीन सदनिका खरेदी करणाऱ्या नागरिकांसाठी ,राज्याच्या मुद्रांक शुल्क आणि नोंदणी महानिरीक्षक कार्यालयानं इ म्युटेशन ही नवी प्रणाली विकसित केली आहे .त्याद्वारे नव्या सदनिकेच्या खरेदी खताची नोंदणी होताच, ही माहिती महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाला कळवली जाणार असून,संबंधित मालमत्ता धारकाची महापालिकेतील नोंदणी आपोआप केली जाणार आहे . येत्या 1 जानेवारीपासून पुणे महापालिका हद्दीत त्याची अंमलबजावणी सुरु केली जाणार आहे .

**आधारकार्ड**

2012 पूर्वी आधार कार्ड काढलेल्या नागरिकांनी या कार्डावरील आपली  माहिती अद्ययावत करणे आवश्यक असून, पुणे जिल्ह्यातील एकंदर 29 लाखाहून अधिक आधार कार्ड धारकांपैकी केवळ 80 हजार नागरिकांनी ही प्रक्रिया पूर्ण केली असल्याची माहिती जिल्हा प्रशासनानं दिली आहे. एप्रिलमध्ये त्यासाठीची विशेष मोहीम सुरु झाल्यानंतर या मोहिमेला मिळणारा प्रतिसाद अत्यल्प असल्याबद्दल प्रशासनाकडून चिंता व्यक्त करण्यात आली आहे. आधार कार्ड जारी करणाऱ्या यू आय डी ए आय या केंद्रीय यंत्रणेनं आधार कार्ड दुरुस्तीचं आवाहन केलं असून त्यासाठीच्या मोहिमेसाठी पुण्यासह देशातल्या 40 जिल्ह्यांची निवड केली आहे.

**क्रिकेट**

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेने स्पोर्ट्स फील्ड मान्सून लीग या 14 वर्षाखालील 30 षटकांच्या क्रिकेट स्पर्धा सुरू आहेत. यामध्ये नेक्स्ट क्रिकेट अकादमी संघानं एस ए आर के क्रिकेट अकादमीचा 16 धावांनी पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. अन्य दुसऱ्या सामन्यात आर्यन्स

क्रिकेट अकादमी संघानं ब्रिलियंट्स स्पोर्ट्स अकादमी चा साठ धावांनी पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली.

**खो-खो**

परभणी मध्ये झालेल्या खुल्या गटाच्या राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेत पुरुष गटात पुणे संघानं अजिंक्यपद पटकावलं.  महिला गटात पुण्याला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं . पुण्याचे राहुल मंडल आणि काजल भोर राजे संभाजी आणि राणी अहिल्या या किताबाचे मानकरी ठरले.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश निरभ्र होतं. कमाल तापमान 32 तर किमान तापमान 17 पूर्णांक 4 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्या किमान तापमानात काहीशी वाढ शक्यता वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हाभेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार**